
Samachar Patrika RNI 16775/1967 Regd. No. MCW-126/2024-26, Published on 15th of every month



# देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाचार




वर्ष ५८ वे, अंक ५वा, मुंबई । जुलै २०२५
एकूण पाने २० । प्रती अंक ₹ ५ । वार्षिक वर्गणी ₹ ५०

Year : 58, Issue : 5, Mumbai I July 2025
Total Pages 20 I Price per Issue ₹ 5 I Yearly Subscription ₹ 50



## हेची दान देगा देवा
## तुझा विसर न व्हावा



देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण

# समाचार


वर्ष ५८वे, अंक ५वा,
जुलै २०२५
(फक्त सभासदांसाठी)



**श्री. महेंद्र गंधे**
अध्यक्ष

**श्री. प्रभाकर कुलकर्णी**
कार्याध्यक्ष

**श्री. विनोद मांडके**
कोषाध्यक्ष

**श्री. मिलिंद सरदेशमुख**
कार्यवाह



**संपादक**
**श्री. मिलिंद सरदेशमुख**
मो. : ९८६७९९४३८९


अंकातील मजकूराशी मंडळ सहमत असेलच असे नाही


दूरध्वनी : २४३०२२७३, २४३०७५७३
ई–मेल : aadrbm@gmail.com
संकेतस्थळ : www.adrbmmahim.in


## अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ सत्कार सोहळा









MF
क्षेत्रज्ञं चापि मां विद्धि सर्वक्षेत्रेषु भारत।
MELGIRI FARMS
Relaxing Huts
Tamarind Umbrella
Toy Train
Pottery
Kids Play Area
Bullocart
Farm Visit 365 Days Bhutta Party Sept & Oct
Hurda Party Dec-feb Farm Tourisim 365 Days
Kitty Parties 365 DaysBirthdays 365 Days
Get Togethers 365 Days Dairy Farm Visit 365 365 Days
Glamping 365 365 Days
Pre & Post Wedding Shoots
Agro Tourism For Schools & Corporates
Direct from FARM FRESH Vegetables & fruits at Your Doorstep on SAME DAY
For BOOKINGS Call:
70137 78442 | 97039 77724
Farm: S.No. 66, 67, 75 & 76A, Yenkepalli, Bakaram Road, Moindabad Mandal, R.R. Dist, Telangana - 500075
R.O. For Correspondence: 3-4-22, Venkatesh Bhuvan, Dr. Bhoomanna Lane, Kachiguda, Hyderabad 500027
/Melgiri Farms
Just 30 mins Drive from
Gachibowli & Hitech City

# संपादकीय

बंधू/भगिनींनो,

जून महिन्याच्या समाचार पत्रिकेमध्ये आपल्या सर्व सभासदांसाठी सामूहिक आरोग्य विमा योजना राबविण्यासाठी मध्यवर्ती मंडळ करत असलेल्या प्रयत्नांची माहिती आम्ही आपल्याला दिली होती. श्री. विनय कुलकर्णी यांनी व्यक्त केलेल्या त्यांच्या अभिप्रायनुसार आमच्यावरील प्रयत्नाचे सभासदांकडून स्वागत होत आहे हे समजल्याचे आम्हाला वेगळेच समाधान लाभलेले असून आमचे कार्यकारी मंडळ सभासदांच्या हितासाठी उत्कर्षासाठी करत असलेल्या प्रयत्नांची सभासद नोंद घेत आहे त्यांचा खरोखरच आनंद झाला व वरील अभिप्रायनुसार ही योजना अधिक प्रभावीपणे कशी आमलात आणता येईल व त्याचा जास्तीत सभासदांना लाभ देता येईल असे आमचे प्रयत्न चालू आहेत. कदाचित सप्टेंबर २०२५ अंकामध्ये या योजनेची पूर्ण माहिती देण्याचा आमचा प्रयत्न राहिल. या मधल्या काळात आपल्या सर्वांना आग्रहांची विनंती की, ज्या सभासदांनी त्यांचा जन्मदिनांक, सध्याचा पत्ता आणि मोबाईल नंबर कळविल्यास अपेक्षित सामूहिक आरोग्य विमाचा लाभ लवकरात लवकर सर्व सभासदांना प्राप्त करून देणे हे आम्हाला सुलभ होईल.

मध्यवर्ती मंडळाने आणखी एक उपक्रम हाती घेतला असून त्या अंतर्गत आम्ही आतापर्यंत गेली अनेक वर्षापासून ज्या व्यक्तींनी मध्यवर्ती मंडळाकडून उच्च शिक्षणासाठी कर्जाऊ शिष्यवृत्ती घेतली होती आणि ज्यांना मंडळाने शैक्षणिक मदत केली होती अशा लाभार्थीची यादी/माहिती संकलित करण्याचे काम सुरू केले असून अजून एक महिन्यात ही माहिती पूर्ण संकलित होईल आणि त्यासर्व लाभार्थींना आम्ही पत्राव्दारे संपर्क करून जास्तीत जास्त शैक्षणिक निधी संकलनाचे काम करण्याचा आमचा हेतू आहे. कारण प्रथमदर्शी असे आढळून आले की, १९७० साला पासून आतापर्यंत ज्यांनी या शैक्षणिक मदतीचा लाभ घेतला आहे ते सर्व आपल्या आयुष्यामध्ये इच्छित यश संपादन करून त्यांनी त्यांच्या क्षेत्रात प्राविण्य मिळवून नाव आणि वैभव संपादन केले असेल आणि आता त्यांच्याकडून आम्ही इतरांसाठी दायित्वाची अपेक्षा करत आहोत ते आम्हाला वाटत कचितच योग्य आहे. याचा लाभ मुख्य तो संलग्न संस्थाना त्यांच्या वृद्धीसाठी आणि कार्य विस्तारासाठी होणार आहे. हे नमूद करावेसे वाटते परंतु संलग्न संस्थांनी सुद्धा या आमच्या उपक्रमानंतर मिळालेल्या माहितीचा योग्य उपयोग करून घेणे इष्ट आहे. आम्ही हे ही कृतज्ञतापूर्वक नमूद करू इच्छितो की, आम्ही नुसते प्रयत्न करत आहोत परंतु याचे खरे श्रेय आमच्या आणि आपल्या पूर्वजांनी आपल्या विद्यार्थी विद्यार्थीनीसाठी राबविलेल्या शैक्षणिक मदतीच्या उपक्रमास आणि त्यांच्या दूरदृष्टीस सलाम आहे. आपल्या पूर्वजांचे व माजी कार्यकारी सदस्यांचे या संबंधी केलेले उपकार, परंपरा यांची परत फेड होऊ शकत नाही. त्यांच्या कल्पकतेला आणि दूरदृष्टीला नमस्कार आणि मानाचा मुजरा.

।। रामाकृष्ण हरी पुंडलिक हरी विठ्ठल ।।

।। जय जय रघुवीर समर्थ ।।

**प्रभाकर पांडुरंग कुलकर्णी**
(कार्याध्यक्ष)

**मिलिंद मल्हरराव सरदेशमुख**
(कार्यवाह/संपादक)

# विशेष सत्कार व गौरव समारंभ (कल्याण)

अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, माहीम, मुंबई या संस्थेच्या माध्यमातून आपल्या परिवारातील जेष्ठ व श्रेष्ठ सभासद / सदस्य श्रीमान यशवंतराव पांगारकर यांची कल्याण जनता सह. बँकेचे नवं नियुक्त अध्यक्ष व इतर मान्यवरांचा सत्कार व गौरव सोहळा शनिवार दिनांक २१ जुन रोजी सायंकाळी पाच ते आठ या वेळेत अहिल्याबाई चौक येथील मधु मालती सभागृहात आयोजित करण्यात आला होता. या समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून कल्याण दिवाणी न्यायालयाचे न्यायाधीश श्रीमान नितीनराव जोशी तसेच अतिरिक्त न्यायाधीश श्रीमान मुळेसाहेब, सत्कारमुर्ती श्रीमान यशवंतराव पांगारकर मध्यवर्ती दे ऋ ब्रा मंडळाचे कार्याध्यक्ष श्रीमान प्रभाकर कुलकर्णी, संस्थेचे कार्यवाह श्रीमान मिलिंद सरदेशमुख, दे ऋ ब्रा, कल्याण शाखा अध्यक्ष श्री. सुरेश कुलकर्णी, दे ऋ ब्रा, डोंबिवली संस्थेचे अध्यक्ष श्री. जगन्नाथराव जोशी व इतर गौरवमुर्ती व बहुसंख्येने मुंबई कल्याण परिसरातील मान्यवर ब्रह्मवृंद उपस्थित होते. सर्व प्रथम रामदास स्वामी यांच्या प्रतिमा पुजन व यानंतर महीला आघाडीने गणेश, सरस्वती, गुरु वंदनेने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर सर्व मान्यवरांचे व उपस्थित ज्ञाती बांधवांचे हार्दिक स्वागत करण्यात आले. यानंतर प्रमुख पाहुणे यांची ओळख अधिवक्ता मंदार कुलकर्णी यांनी सर्वांना करुन दिली त्यांचा यथोचित सत्कार मध्यवर्ती मंडळ कार्याध्यक्ष प्रभाकर कुलकर्णी यांनी शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन करण्यात आला. त्यांनंतर अतिरिक्त न्यायाधीश कल्याण श्रीमान मुळे साहेब यांचा सत्कार श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन कार्यवाह श्री. मिलिंद सरदेशमुख यांनी केला. त्यांनंतर श्रीमान मुळे यांनी संस्थेच्या उत्कृष्ट कार्याबद्दल प्रशंसा करुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. त्यानंतर कल्याण जनता बँकेचे माजी अध्यक्ष अधिवक्ता श्री. सुरेश पटवर्धन यांनी कल्याण जनता बँकेच्या वाटचाली ची माहिती उपस्थितींना दिली. यासोबत नवं नियुक्त अध्यक्ष श्री. यशवंतराव पांगारकर यांचा अल्प परिचय त्यांनी सर्वांना करुन दिला. त्यानंतर श्रीमान यशवंतराव पांगारकर यांचा पगडी, शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन न्यायाधीश श्रीमान जोशी साहेब व श्री. मुळे साहेब यांच्या हस्ते यथोचित सत्कार करण्यात आला. श्रीमान पांगारकर यांनी सत्काराला उत्तर देताना आपल्या ब्राह्मण संस्था करीत असलेल्या सामाजिक, शैक्षणिक कार्यास शुभेच्छा दिल्या . त्यानंतर इतर खालील गौरव मुर्तींचा शाल, श्रीफळ,व पुष्पगुच्छ देऊन सन्मान विविध मान्यवर पदाधिकारी यांच्या हस्ते करण्यात आले.

यात प्रामुख्याने १) श्री. मंगेश पाटील नवनिर्वाचित उपाध्यक्ष कल्याण जनता सह. बँक, सरदार पटेल कॉलेज तून बीई इलेक्ट्रिकल, आर एन डी, प्रोजेक्ट, व सप्लाय चेन चार उत्तम अनुभव, आर एस एस स्वयंसेवक व उत्तम जनसंपर्क अधिकारी २) श्री. पद्मनाभ जोशी, संचालक विश्वस्त निधी जनता सहकारी बँक, बीई इलेक्ट्रिकल, शिक्षण संस्थेत सेक्रेटरी, आरएसएसचे उत्तम स्वयंसेवक, कबड्डीचा प्रसार व कार्य, तसेच दांडगा जनसंपर्क गेली दहा वर्षे कल्याण जनता बँकेचे संचालक, सध्या आरबीआय स्थापित बोर्ड मॅनेजमेंट चे अध्यक्ष, संचालक समाजसेवा निधी न्यासचे सेक्रेटरी. ३) डॉ. श्री. केतन खरे (पी.एच.डी), विशेष प्राविण्य, ज्योतिष शास्त्री, वेदमूर्ती, एम ए कृष्णमूर्ती पद्धतीने बीए, नक्षत्र ज्योतिष विशारद, डॉक्टर इन ज्योतिष, २०१८ मध्ये संमेलनातून जीवनगौरव पुरस्कार, वैदिक कर्मकांड विषयी डिग्री, तसेच पौरोहित्यामध्ये २५ वर्षाहून अनुभव. ४) कुमारी मनवा मंदार कुलकर्णी विशेष प्राविण्य, मानसशास्त्राची पदवी व प्राविण्य पूर्ण केले, अनेक स्पर्धांमधून प्राविण्य पारितोषिक मिळवले, लेखन वाचन यात आनंद घेणे, व आपल्या संस्थेची सभासद. ५) डॉक्टर अपूर्वा कुलकर्णी विशेष प्राविण्य, शाळेत व कॉलेजमध्ये आदर्श विद्यार्थिनी, सी एच एम कॉलेजमध्ये मिस कॉलेज तरुणी, एमबीबीएसची पदवी एमडी मेडिसिनच्या अभ्यासक्रमात कार्यरत, संगीत विशारद,

६) डॉक्टर जान्हवी जोशी विशेष प्राविण्य, एमबीबीएस पदवी, सोमय्या कॉलेजमधून एम एस, गायनॅक म्हणून सध्या कार्यरत, ७) डॉक्टर केतकी कुलकर्णी, तेरणा कॉलेज मधून कॉम्प्युटर्स सायन्स मध्ये इंजिनिअरिंग, यु एस मधून एम एस, स्कीपिंग स्पोर्ट्सची आवड व गोल्ड मेडल, सध्या न्यूयॉर्कमध्ये मेट्रो ट्रान्सपोर्ट ऑथॉरिटी मध्ये बिझनेस नालिस्ट म्हणून कार्यरत आहे.

वरील सर्वांचे सत्कार व गौरव कार्यक्रमास उपस्थित असलेल्या विविध मान्यवरांच्या हस्ते शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन करण्यात आले. प्रथम सर्वांचे स्वागत चहापान व नाष्ट्याने झाले, कार्यक्रमाचे सुटसुटीत सूत्रसंचालन श्री मंदार कुलकर्णी व सौ कोमल कुलकर्णी यांनी केले कार्यक्रमाची प्रस्तावना मध्यवर्तीचे कार्यवाह श्री मिलिंद सरदेशमुख यांनी केले त्यानंतर मध्यवर्तीची वाटचाल व तिचे कार्याविषयी माहिती मध्यवर्तीचे कार्याध्यक्ष श्री. प्रभाकर कुलकर्णी यांनी केले. यामध्ये सत्कारमूर्ती व गौरव मूर्तींनी आपले मनोगत व्यक्त केले होते, व त्या सत्काराबद्दल संस्थेचे मनापासून आभार मानले होते, यानंतर संस्थेचे सभासद श्री जयंत देशमुख यांनी सर्वांचे आभार मानले व कार्यक्रम संपन्न झाला, या कार्यक्रमास बदलापूर उल्हासनगर, डोंबिवली, मुलुंड, विलेपार्ले, दादर, कल्याण, मधील ब्राह्मण/इतर संस्थेचे प्रतिनिधी आणि पदाधिकारी बहुसंख्येने उपस्थित होत.

## गुरुमहिमा

**स.भ. मोहनबुवा रामदासी (मो. : ९१४६८५५६९१)**

जगामध्ये ज्ञानाचा प्रकाश पसरवणारे, अज्ञानाचा अंधार दूर करणारे आणि शिष्याला योग्य मार्गावर आणणारे व्यक्तिमत्व म्हणजे 'गुरु'. भारतीय संस्कृतीत गुरुला नेहमीच देवापेक्षाही श्रेष्ठ मानले गेले आहे. 'गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः, गुरुः साक्षात् परब्रह्म तस्मै श्री गुरवे नमः' या श्लोकातून गुरुचे सर्वोच्च स्थान स्पष्ट होते. महाराष्ट्राच्या संत परंपरेतही गुरुमहिमेला अनन्यसाधारण महत्त्व दिले आहे, आणि समर्थ रामदास स्वामींनी त्यांच्या 'दासबोध' ग्रंथातून या गुरुतत्त्वाचे अत्यंत सखोल आणि व्यावहारिक विवेचन केले आहे.

सदगुरुविण ज्ञान कांही । सर्वथा होणार नाही ।<br>
अज्ञान प्राणी प्रवाही । वाहातचि गेले ।।२१।। - श्रीमद दासबोध दशक ५ समास १

या भूतलावर जन्म घेतलेल्या प्रत्येक मनुष्यास जोपर्यंत त्यांच्या जन्माचे कारण समजणार नाही तोपर्यंत तो अज्ञानी पुन्हा पुन्हा जन्म मरणाच्या फेऱ्यात गुंतून राहील. जेव्हा त्याला स्वतःचे ज्ञान होईल, त्याच्या जन्माचे कारण समजेल आणि परमेश्वराच्या उर्जारुपी शक्तीची त्याला जाणीव होईल तेव्हा तो या फेऱ्यातून बाहेर पडू शकतो. हे ज्ञान त्याला सदगुरुशिवाय कोणीही देऊ शकत नाही. त्यामुळेच सदगुरुचे अनन्यसाधारण असे महत्व आहे.

नाना साधनें बापुडी । सदगुरुविण करती वेडीं ।<br>
गुरुकृपेविण कुडकुडीं । वेर्थचि होती ।।२४।। - श्रीमद दासबोध दशक ५ समास १

लोक अनेक साधना करतात. हरीकथा करतात, कीर्तने करतात, माघस्नान, व्रत, उद्यापने, दान-धर्म इ. अनेक प्रकार करतात परंतू ही सर्व साधने तेव्हाच उपयोगी पडतात जेव्हा सदगुरुची कृपा आपल्यावर असते. सदगुरुंच्या मार्गदर्शनाखाली केलेली साधनाच आपल्याला या भवसागरातून पार करु शकते. इतर कुठलाही मार्ग आपल्याला यातून वाचवू शकत नाही.

सदगुरुचेनि अभयंकरे । प्रगट होईजे ईश्वरें ।।<br>
संसारदुःखे अपारे । नासोन जाती ।।४०।। - श्रीमद दासबोध दशक ५ समास १

जोपर्यंत आपल्या मस्तकावर सद्गुरुंचा हात असत नाही, आनल्याला सद्गुरुचे अभय असत नाही तोपर्यंत आपल्याला ईश्वर प्राप्त होत नाही. जेव्हा सद्गुरु आपल्या पाठिशी उभे राहतात व आपल्याला अभय देतात तेव्हा आपणासमोर ईश्वराचे रुप प्रकट होते. तेव्हा आपल्याला खरे ईश्वराचे असणे उमगते. सद्गुरुंच्या अशा कृपेने संसारातील दुःख क्षणार्धात नाहीसे होऊन आपल्याला मुक्ती प्राप्त करुन देण्याचे सामर्थ्य फक्त सद्गुरुंच्या अंगीच असते.आपण पुराणात व इतिहासातही पाहतो की जे जे अनेक संत, मुनी होऊन गेले त्यांनीही सद्गुरुंच्याच मार्गदर्शनाखाली साधना केली. प्रभू श्रीराम, कृष्ण यांनीही गुरुंच्या सेवेत राहून आपल्या सद्गुरुप्रती प्रेम व आदरभाव दाखवला. देवदेवतांनाही सद्गुरुशिवाय आपले इप्सित साध्य करता आलेले नाही.

समर्थ रामदासांनी आपल्या श्रीमद दासबोध या ग्रंथात अनेक ठिकाणी गुरुचे महात्म वर्णन केले आहे. श्री समर्थ आपल्याला सद्गुरु कसा ओळखावा हे ही सांगतात ते म्हणतात –

जे ब्रह्मज्ञान उपदेसी । अज्ञानअंधारे निरसी ।।<br>
जीवात्मयां परमात्मयांसी । ऐक्यता करी ।।९।। – श्रीमद दासबोध दशक ५ समास २

आपल्या आयुष्यात अनेक शिक्षक आपल्याला भेटतात, आई वडील यांनाही आपण गुरुच मानतो, परंतू जो आपल्याला ब्रह्मज्ञानाचा उपदेश करतो व आपल्या मनावरचा अंधःकार दूर करतो. ज्यांच्या उपदेशाने आपले अज्ञान दूर होऊन आपला जीव व परमात्मा एकरुप होतात, असे ज्यांच्या कृपेने होते तोच खरा सद्गुरु होय.

म्हणौनि सद्गुरु वर्णवेना । हे गे हेचि माझि वर्णना ।।<br>
अंतरस्थितीचिया खुणा । अंतर्निष्ठ जाणती ।।३१।। – श्रीमद दासबोध दशक १ समास ४


**JV MARKETING & INVESTMENTS**

*Premium Residential & Corporate Real Estate Advisor*

*Sales And Marketing Of New Projects*<br>
*Pre-leased Commercial & Retail Options*<br>
*Business & Home Loan Assistance*

*Rahul V. Deshpande* — *+91 98330 25031*<br>
*MBA - Marketing* — *jvmarketinginvestments@gmail.com*

*Samarth Raghukul, Gokhale Road South, Dadar West, Mumbai - 400 028*<br>
*MahaRERA ID - A51900028785* *@jvmarketing18* *jvmarketing18*

**For enquiries and bookings in new projects across Mumbai, Thane and Navi Mumbai, kindly contact Rahul V. Deshpande - 98330 25031**

# डॉक्टरकडे जाताना

**डॉ. नीरज रायते (मो. ९९२२४२७०६७)**

डॉक्टरकडे जाताना आपल्याला होत असलेल्या आजाराचे योग्य 'निदान' होणे हे उपचाराच्या दृष्टीने महत्त्वाचे असते यात शंकाच नाही. त्यामुळे या प्रक्रियेत रुग्णाचा शंभर टक्के सहभाग असणे आवश्यक असते. रुग्णाने स्वत:हून डॉक्टरकडे जाणे, ते पण विनाविलंब जाणे खूपच महत्त्वाचे असते फोन करुन, रिपोर्टस् पाठवून, हस्ते - परहस्ते आपल्या आजाराविषयी चौकशी करणारे अनेक रुग्ण असतात. याशिवाय 'सहज भेटलो' म्हणून सल्ला विचारणारे अनेक महाभाग असतात. अशा वेळी अपुऱ्या माहितीवर चुकीचे सल्ले दिले जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. मी स्वतः अश्या चर्चा शक्यतो टाळतो आणि विनम्रपणे शांतपणे भेटण्याविषयी सुचवतो .विविध ठिकाणी आयोजित केलेल्या रोगनिदान किंवा आरोग्य शिबिरात मोफत तपासणी करुन विनाकारण चिंता करणारे चिंतातुर रुग्ण अलीकडे वाढले आहेत. हे पूर्णपणे चुकीचे आहे. एखादे 'अबनॉर्मल' फाईडिंग म्हणजे विलक्षण गंभीर परिस्थिती आहे असे मानणे चुकीचे असते. तसेच एखादे लक्षण म्हणजे मोठ्ठा रोग असे समजून धावाधाव करणे निश्चितच वेडेपणाचे! खोकला हा सर्दी पडशाने होतो, तसाच टी. बी.च्या आजारात असतो किंवा फुप्फुसाच्या कॅन्सरमध्येही असतो. संडासवाटे होणारा रक्तस्राव हा फिशर अर्थात भगंदर मुळे असू शकतो तसाच तो मोठ्या आतड्याच्या कॅन्सरमुळे ही असू शकतो त्यासाठी डॉक्टरांचा प्रत्यक्ष भेटून सल्ला घेणे, तपासणी करणे आणि रोगनिदान निश्चित होणे आवश्यक असते. 'कावीळ' लिव्हरच्या आजारात असते. तशी रक्तपेशीच्या विकृतीमुळे किंवा पित्ताशय, पित्तखडे यामुळे होते. या सगळ्याच आजारांचे उपचार वेगवेगळे असतात. म्हणून आरोग्य तपासणी करणे हेच योग्य असते. तसे न करता गंडेदोरे, काढे, झाडपाला असे अशास्त्रीय अघोरी उपचार करणे रुग्णाच्या हिताचे नसते हे लक्षात घ्यायला हवे. आजाराचे निश्चित निदान, स्वरुप, गांभीर्य समजून घेण्यासाठी डॉक्टरांची भेट घेणे, त्यांना सर्व माहिती देणे, शारीरिक तपासणी करणे, आवश्यक त्या प्रयोगशालेय चाचण्या करणे आपल्याच हिताचे असते. डॉक्टरांचे असे मार्गदर्शन नेहमीच मोलाचे असते! मित्रांनो, आपण हे पण लक्षात घ्यायला हवे की, काही आजार गनिमी कावा करणाऱ्या शत्रूंसारखे असतात. ते अचानक घाला घालतात. अशा आजारांची पूर्वसूचना बऱ्याच वेळा नित्यनैमित्तिक शारीरिक तपासणीत मिळते. रुग्णाला कुठलाही त्रास नसताना, कुठलेही लक्षण किंवा चिन्ह नसताना, मधुमेह, अतिरक्तदाब, जन्मजात हृदयविकार असे आजार अनेक दिवस छुपे राहतात. कोव्हिडनंतर समाजाचा आरोग्याकडे बघण्याचा दृष्टिकोन सकारात्मक झाला आहे ही चांगली बाब आहे. ४० शी नंतर वाढदिवसाच्या दुसऱ्या दिवशी वर्षातून एकदा आरोग्य तपासणी मला महत्त्वाची वाटते ह्या तपासणीमुळे अनेक छूप्या आजारांचे लवकर निदान झाल्याने आपले आयुष्मान नक्कीच वाढू शकते. पुरुषांमध्ये करायच्या तपासण्या वेगवेगळ्या असतात . हृदयाच्या व आरोग्याच्या सर्व तपासण्यामध्ये पुरुषामधे प्रोस्टेटची तपासणी तर स्त्रीयांमध्ये pap smear ही गर्भपीशवीच्या तोंडाची तपासणी तसेच स्तनांची mammography महत्त्वाची आहे. अशा नियमित दरवर्षी केलेल्या तपासण्या तुलनात्मक अभ्यासासाठी बऱ्या पडतात. त्यामुळे लवकर झालेले निदान पुढील अडचणी टाळू शकते .गर्भारपणीच्या नेहमीच्या तपासणीत अशा छुप्या जन्मजात विकृती सोनोग्राफीमध्ये लक्षात येऊ शकतात. सुलभ प्रसूतीसाठी अशी तपासणी करणे आईच्या आणि बाळांच्या स्वास्थ्यासाठी आवश्यक असते. अशा तपासण्यांना 'स्क्रीनिंग टेस्ट' असे म्हणतात. व्याधीचे निदान अगदी प्राथमिक अवस्थेत होण्यासाठी त्या उपयोगी आहेत. 'हेल्थ चेक अप' ही आता दृढ झालेली संकल्पना आहे. आपला वाढदिवस साजरा करताना त्यासोबत

आपल्याच स्वास्थ्यासाठी, सुरक्षित भवितव्यासाठी डॉक्टरकडे जाऊन संपूर्ण शारीरिक तपासणी आणि महत्त्वाच्या प्रयोगशालेय चाचण्या करून घेणे..., त्याची नोंद ठेवणे आपल्याच हिताचे आहे हे लक्षात घ्यायला हवे.

निरामय जीवन हेच आपले वैभव आहे. आजारी पडल्यानंतर धावाधाव करण्यापेक्षा आजारीच पडू नये यासाठी धडपडणे हे सुजाण व्यक्तीचे लक्षण आहे; असे सुजाण नागरिक समर्थ आणि संपन्न देश बनवितात. आपल्या डॉक्टरमित्रांच्या मार्गदर्शनानुसार जीवनाची निरामय वाटचाल करणे आपल्याच हाती आहे. हे लक्षात घ्यायला हवे!

## देवर्षी नारद

**सौ. कुंदा कुलकर्णी** (मो. : ९५२७४६०२९०)

अहो देवर्षिधन्योऽयं यत्कीर्ति शार्ङ्गधन्वनः । गायन्माद्यन्निदं तंत्र्या रमयत्त्यातुरं जगत् ।।

अहो! हे देवर्षी नारद धन्य आहेत. जे आपली वीणा वाजवीत भगवत - गुणगायनात तल्लीन होतात व संसारदुःखाने तप्त जीवांना सदा आनंदित करतात.

नर = पाणी. जलदान, ज्ञानदान आणि सर्वांना तर्पण अर्पण करण्यात पारंगत असल्यामुळे त्यांना नारद म्हणतात. ते वेद, उपनिषदांचे पारखे, देवांचे उपासक, पुराणांचे पारखी, आयुर्वेद आणि ज्योतिष शास्त्राचे महान अभ्यासक, संगीत तज्ञ आणि प्रभावी वक्ता आहेत.

आद्य पत्रकार, महागुरू व एकमेव देवर्षी असे नारद मुनी. देवर्षी नारद हे भगवान विष्णूंचे महान भक्त

Know Your Future

Dr. AMIT JAYANT DESHMUKH

*Assistant Professor* B.Com. MA., P.Hd.

- Authorised Insurance Advisor • Investment Consultant
- Mediclaim • AMFI Registered Mutual Fund Partner



*Bhakti Shastri*

- Certified Astrologer
- Palmist
- Numerologist
- Cyber Crime Investigator
- Meditation
- Yoga
- Vastu

AMIT JAYANT

Scan to pay with any UPI app

**Prediction Per Person / Consultation Rs. 501 / 201**

**Computerised Horoscope Rs. 102/-**

Whatsapp & Google Pay : **9702837022 / 9930445721**

Email: 16108ad@gmail.com

***Priority Consultation on Advance Payment***

आहेत. ते विश्वाचे निर्माते ब्रम्हा आणि विद्येची देवी माता सरस्वती यांचे पुत्र आहेत. भारतातील ऋषीमुनींपैकी फक्त नारदमुनींनाच देवर्षी ही पदवी मिळालेली आहे कारण देवत्व आणि ऋषीत्व या दोन्हीचा समन्वय त्यांच्यात होता. त्यांना ब्रह्मदेवांकडून वरदान मिळाले आहे. त्यामुळे ते आकाश, पाताळ, पृथ्वी या तीनही लोकात भ्रमण करून देव, संत महात्मे, इंद्रादी शासक आणि जनमानसाशी थेट संवाद साधू शकत. त्यांची सुखदुःखे जाणून घेत अडचणी निवारण्याचा प्रयत्न करत म्हणूनच ते देवांना जेवढे प्रिय होते तेवढेच ते राक्षस कुळामध्येही प्रिय होते. पृथ्वी आणि पाताळ लोकातील माहिती देवांपर्यंत पोहोचवण्याचे काम देवर्षी नारद करत म्हणूनच त्यांना आद्य पत्रकार म्हटले जाते. ते सडेतोड पत्रकार होते. उन्हाळ्यात जल व्यवस्थापनाचा संदेश देताना नारद मुनींनी वाटसरूंसाठी रस्त्यावर ठिकठिकाणी पाणपोयी उभारण्याची कल्पना सर्वप्रथम राबवली. त्यांनी अनेक स्मृती रचून त्यात दंड विधान निश्चित करण्याचे काम केले. दंडाच्या भयाने तरी मानवाने गुन्हेगारी वृत्तीकडे वळू नये असा त्यांचा हेतू होता. त्यांच्या एका हातात वीणा असते तर दुसऱ्या हातात चिपळ्या. त्याद्वारे ते भक्तीचा प्रसार करत. कीर्तन भक्तीचे श्रेय नारद मुनींनाच आहे. नारद मुनी जगाला भक्तीचा सोपा मार्ग दाखवणारे, भक्तीरसाचा सुगंध देणारे मुनी आहेत. भक्ती म्हणजे काय हे जगाला पटवून सांगणारे देवर्षी नारद धर्मशास्त्रामध्ये पारंगत आहेत. त्यांनी नारद पुराणाची रचना केली. ते स्वतः उत्तम वक्ते आणि श्रोताही आहेत. भक्त प्रल्हाद, ध्रुव बाळ, राजा अंबरीश अशा महान व्यक्तिमत्त्वांना भक्ती मार्गावर त्यांनी नेले. नारद पुराण हे मानवाच्या सहिष्णुवृत्तीचे आदर्श उदाहरणच आहे. सर्व विषयात पारंगत नारद मुनी संगीताचे महागुरू आहेत. वीणा हे त्यांचे प्रिय वाद्य. सनत्कुमार कुलगुरू असलेल्या सर्वात पहिल्या विद्यापीठात नारदांची मुलाखत घेण्यात आली होती. त्यावेळी सर्व विषयातील त्यांचे प्रभुत्व पाहून सनत्कुमार थक्क झाले होते. गॉड पार्टिकल किंवा ईश्वरीय कणाची संकल्पना त्यांनीच प्रथम मांडली. त्यांनी ज्योतिष विज्ञानाच्या व्यावहारिक वापराविषयी खगोलीय परिणाम सांगून रचना स्पष्ट केल्या. अतिसूक्ष्म परमाणूंपासून अतिविशाल विष्णू या कर्त्याच्या रूपात भ्रमण करत विश्वाला प्राणवायू प्रदान केला जातो. विष्णू म्हणजे विश्व + अणु अशी व्याख्या त्यांनी केली.

नारद मुनींनी भृगु कन्या लक्ष्मीचा विवाह विष्णूशी लावून दिला. इंद्राची समजूत घालून ऊर्वशी आणि पुरुरवा यांचे सूत जमवले. महादेवांकडून जालंधरचा विनाश करवला. कंसाला आकाशवाणीचा अर्थ समजावला. इंद्र, चंद्र, विष्णू, शंकर, युधिष्ठिर, राम, कृष्ण यांना उपदेश देऊन कर्तव्याकडे वळवले. ते ब्रह्माजींकडून संगीत शिकले. ते अनेक कला व विषयांत पारंगत आहेत. ते त्रिकालदर्शी आहेत. वेदांतप्रिय, योगनिष्ठ, संगीत शास्त्री, औषधी ज्ञाता, शास्त्रांचे आचार्य व भक्ती रसाचे प्रमुख मानले जातात. ते श्रुती-स्मृती, इतिहास, पुराण, व्याकरण, वेदांग, संगीत, खगोल-भूगोल, ज्योतिष, व योग यासारख्या अनेक शास्त्रांचे प्रचंड गाढे विद्वान आहेत. त्यांनी पंचवीस हजार श्लोकांचे प्रसिद्ध नारद पुराण रचले. नारद संहिता हा संगीताचा उत्कृष्ट ग्रंथ रचला. नारद के भक्तिसूत्र, बृहन्नारदीय उपपुराणसंहिता, नारद-परिव्राज कोपनिषद व नारदीय शिक्षेसह अनेक स्तोत्रे देखील त्यांनी रचलेली आहेत.

काही कारणामुळे प्रजापती दक्षाने त्यांना शाप दिला की दोन मिनिटापेक्षा जास्त काळ ते कुठेही राहू शकणार नाहीत. त्यामुळे नारद सतत भ्रमण करत असतात. ब्रह्माजींच्या शापामुळे ते आजीवन अविवाहित राहिले. त्यांच्या नावावर नारदभक्तिसूत्रे, नारद स्मृती, नारदपंचरात्र, संगीत मकरंद, राग निरूपण, पंचसारसंहिता, दत्तील नारदसंवाद असे ग्रंथ आहेत.

कळलावे आणि कलहप्रिय अशी त्यांची ख्याती आहे. पण या दोन्हींतून ते चांगल्याच गोष्टी करत होते. नारद मुनींच्या काही मिनिटांच्या सत्संगाने वाल्याचा वाल्मिकी झाला. ते महर्षी वेद व्यासांचे गुरु होते. नारदमुनी अमर आहेत. त्यांना कोटी कोटी प्रणाम.

# संलग्न संस्था वृत्त

*** मुलुंड** : देशस्त ऋग्वेदी ब्राह्मण संस्था मुलुंड तर्फे शनिवार दिनांक १५ जून २५ रोजी संध्याकाळी साडेचार वाजता संस्थेच्या सभागृहात गुणगौरव समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.मुलुंड पूर्व पश्चिम मधील शाळा व ज्युनियर कॉलेज (सायन्स कला वाणिज्य) या मधून पहिल्या आलेल्या विद्यार्थी-विद्यार्थिनीचा सत्कार या कार्यक्रमात सस्थेतर्फे प्रमाणपत्र व रोख बक्षीस देऊन करण्यात येतो. सौ. उज्वला जोशी (महिला शाखा उपाध्यक्षा, विश्वस्त मंडळाच्या सदस्य), प्रमुख पाहुण्या डॉ.भारती निरगुडकर (M.A., MPhil, Phd, मराठी मध्ये), श्री विजय वडगबाळकर (विश्वस्त प्रमुख), श्री भगवान आडगावकर (कार्याध्यक्ष) यांनी दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात केली. सौ. अरुणा अग्निहोत्री यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत सगळ्यांचे स्वागत केले. सौ अरुणा अग्निहोत्री यांनी अतिशय सुंदर प्रकारे सूत्रसंचालन केले. श्री विजय वडगबाळकर यांनी संस्था परिचय करून दिला. त्यांनी संस्थेची उद्दिष्टे सामाजिक, धार्मिक करण्यात येणारा कार्यक्रमाबद्दल माहिती दिली. सौ प्रतिमा जोशी यांनी प्रमुख पाहुण्या डॉ.भारती निरगुडकर यांचा परिचय करून दिला.सौ.उज्वला जोशी यांनी त्यांचे भेटवस्तू व तुळशीचे रोप देऊन स्वागत केले. डॉक्टर भारती निरगुडकर यांनी आपल्या मनोगतात आजकाल कोणालाही उपदेश केलेला आवडत नाही असे सांगतिले.छोट्या छोट्या गोष्टी सांगत काही मौलिक सल्ले दिले. भारती ताईंनी मुलांनी तसेच सर्वांनी मोबाईल, फेसबुक अशा सोशल मीडियापासून लांबच राहावे असे सांगितले. सोशल मीडिया हे सुद्धा एक व्यसन आहे. कोणती गोष्ट पोस्ट करावी करू नये याचे भान राहत नाही त्यामुळे कामापुरता वापर ठेवावा. मातृभूमी, मातृभाषा, माता-पिता व गुरु त्याचप्रमाणे आपली शाळा यांना कधीच विसरू नये असे भारतीताईंनी नमूद केले. जे काम तुम्ही आज करू शकता ते कधीही उद्यावर ढकलू नये हे एका कथेद्वारे सांगितले. अभ्यासक्रम निवडताना दुसऱ्याचे अनुकरण, सामाजिक दबाव याच्या विचार न करता आपल्याला जे आवडते,जे आपण यशस्वीपणे करू शकतो, भविष्यात व्यवस्थित अर्थार्जन होईल याचा विचार करावा. निरंतर श्रम, नीतिमत्ता व नाते यांच्याशिवाय यश कीर्ती कधीही मिळत नाही असे भारतीताईंनी सांगितले. सौ आरती कुलकर्णी यांनी प्रथम क्रमांक, विशेष प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थी-विद्यार्थिनींची नावे जाहीर केली. त्यांच्या मान्यवरांकडून सत्कार करण्यात आला. श्री भगवान आडगावकर यांनी आभार मानले.विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमासाठी आलेल्या सर्वांना अल्पोपहार देण्यात आला.

*** सोलापूर** : देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्था सोलापूर यांच्यातर्फे बुधवार दि. ७ मे रोजी द्वारकाधीश मंदिरात नऊ बटूंवर सामुदायिक उपनयन संस्कार सोहळा मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला. बाजार समितीचे नूतन संचालक मनीष देशमुख यांच्यासह ब्राह्मण समाजातील अनेक मान्यवर नागरिक यावेळी उपस्थित होते. या उपनयन सोहळ्याचे पौरोहित्य जयंत तुळजापूरकर यांच्या नेतृत्वाखाली संस्थेचे कार्यवाह श्याम जोशी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी पार पाडले. या कार्यक्रमाची सुरुवात द्वारकाधीश मंदिरातील गोमातेचे पूजन करून करण्यात आली. तसेच यावेळी लक्ष्मीनारायण प्रतिमेचे, समर्थ रामदास स्वामी यांच्या प्रतिमेचे पूजन आणि कलशस्थापनाही करण्यात आली. त्यानंतर क्रमाक्रमाने धार्मिक विधी झाले. मंगलाष्टका झाल्यानंतर सर्व पाहुणे मंडळींचे सुरुची भोजन होऊन हा कार्यक्रम संपला. या मौजीवंधन सोहळ्यात अहिल्यानगर, पालघर येथील बटूंसह सोलापुरातील बटूही सहभागी झाले होते. हा मौजीबंधन सोहळा पूर्णपणे मोफत करण्यात आला. तसेच बटूंसमवेत येणाऱ्या मर्यादित पाहुणे मंडळींना मोफत भोजनाची व्यवस्थाही करण्यात आली होती. तसेच मुंजी साठी लागणारे सर्व साहित्य आणि सर्व धार्मिक विधी संस्थेतर्फे केले गेले. या सामुदायिक उपनयन संस्कार

सोहळ्याच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात अनेकांनी रक्तदान करून आपली सामाजिक जबाबदारी पार पाडली. यासाठी डॉक्टर हेडगेवार रक्त संकलन केंद्राचे व्यवस्थापक रंगनाथ जोशी जनसंपर्क अधिकारी सुनील हरहरे, यांच्यासह त्यांच्या टीमने सहकार्य केले. या कार्यक्रमास अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ मुंबईच्या सचिवा रोहिणी तडवळकर, मध्यवर्ती मंडळाचे कार्यकारणी सदस्य दत्ता आराध्ये, द्वारकाधीश मंदिराचे व्यवस्थापक दत्तात्रय पाठक, देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोतेजक संस्थेचे सोलापूरचे अध्यक्ष डॉक्टर श्रीकांत येळेगावकर, कार्यवाह श्यामराव जोशी, महिला अध्यक्षा हेमाताई चिंचोलकर, युवक अध्यक्ष सुशांत कुलकर्णी, कोषाध्यक्ष सतीश पाटील, विजय कुलकर्णी, शंकरराव कुलकर्णी, रंगनाथ जोशी, ब्राह्मण सेवा संघाचे राम तडवळकर, अमृता गोसावी संपदा जोशी, निशिकांत खेडकर, नितीन कुलकर्णी, बजरंग कुलकर्णी, डी. डी. कुलकर्णी, रवींद्र नाशिककर, सीमा देशपांडे, श्रीकांत कुलकर्णी, क्षितिजा गाताडे आदींसह अनेक मान्यवर उपस्थित होते. हा उपनयन संस्कार सोहळा यशस्वी होण्यासाठी महिला शाखेच्या अध्यक्षा हेमाताई चिंचोलकर, संस्थेचे कार्यकारणी सदस्य शंकरराव कुलकर्णी यांच्यासह अनेकांनी अर्थसाह्य करून संस्थेच्या कार्यास हातभार लावला. पद्माकर कुलकर्णी यांच्यातर्फे बटूंना उपनयन संस्काराची माहिती देणारे तर सीमा देशपांडे यांच्यातर्फे धार्मिक पुस्तक भेट देण्यात आली. रोहिणी तडवळकर यांच्यातर्फे बटूंना भेटवस्तू देण्यात आली.

✼ **संभाजीनगर** : दिनांक ०२/०५/२०२५ रोजी देशस्थ ऋग्वेदी ब्राम्हण समाजाचा उपनयन संस्काराचा उपक्रम सप्तपदी मंगल कार्यालयात यशस्वी रित्या पार पडला. सलग चौथ्या वर्षी मंडळाने केलेल्या या उपक्रमांत २१ बटु चा सहभाग होता. मंडळाने पालकांची केलेली राहायची खोली व्यवस्था, मातृभोजन व्यवस्था, पूजा विधी व्यवस्था, स्वागत व्यवस्था, भोजन व्यवस्था पाणी आणि विजेची सोय उल्लेखनीय होती. सप्तपदी कार्यालयाचे प्रमुख श्री कुलकर्णी साहेबांनी यात विशेष मदत केली. मंडळाचे अध्यक्ष श्री नरेश जोशी आणि महिला अध्यक्ष श्रीमती मोनिका ताई चौधरी या दोघांच्या नेतृत्वात मंडळाचे सर्व पुरुष पदाधिकारी आणि महिला पदाधिकारी स्वतःचे काम चोखपणे बजावत होते. श्री रविंद्र जोशी व सौ. स्वानंदी जोशी यांनी उत्तम रित्या गुरुकुल देखावा केला होता. हे कार्यक्रमाचे वेगळे आकर्षण ठरले. वेद शास्त्र संपन्न श्री मंदार कुलकर्णी गुरुजी आणि त्यांच्या सहकारी गुरुजींनी धार्मिक विधीचे काम यशस्वी रित्या पार पाडले. सर्व विधीचा अर्थ समजावून सांगितला. त्यामुळे सर्वांच्या आपल्या धर्म ज्ञानात चांगली भर पडली. बऱ्याच दात्यांनी या उपक्रमासाठी स्वखुशीने वस्तू आणि निधी स्वरूपात देणगी दिल्या. त्यांचे हे पवित्र कार्य खुप अनमोल ठरले. मंडळाला हा महत्त्वपूर्ण आशीर्वाद मिळाला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून अहिल्यानगर चे भाजपचे उपाध्यक्ष व देशस्थ ऋग्वेदी ब्राम्हण समाज मध्यवर्ती मंडळ मुंबई चे नवनिर्वाचित अध्यक्ष श्री भैय्यासाहेब गंधे व त्यांच्या पत्नी सौ. मीनलताई गंधे उद्योजक रविंद्र वैद्य, शुभदा वैद्य (अर्धापूर्कर) उपस्थीत होते. आपला ब्राम्हण समाज एकजुटीने राहून आपला धर्म जागृत ठेवू शकतो आणि स्वतःचा आर्थिक विकास करू शकतो याचे त्यांनी छान मार्गदर्शन केले. मध्यवर्ती मंडळ संभाजीनगर च्या मंडळाच्या पाठीशी मोठ्या भावासारखे कायम उभे आहे हे आश्वासन दिले. ज्ञानेश्वर माऊलीचे पसायदान म्हणून या कार्यक्रमाचा निरोप करण्यात आला. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष श्री नरेश जोशी वसेकर महिला अध्यक्ष श्रीमती मोनीकाताई चौधरी महिला कार्यकारीणी सदस्य मयुरी ताई दाभाडकर उपाध्यक्ष श्री रवींद्र जेऊरकर सचिव श्री प्रशांत दाभाडकर कोषाध्यक्ष श्री अंबादास जिंतूरकर प्रसिद्धी प्रमुख श्री मिलिंद दाभाडकर का. सदस्य श्री श्रीपाद मुगुटे श्री वैभव देशपांडे श्री नरेश पटवर्धन श्री गोपाळ कुलकर्णी पदाधिकारी श्री पद्माकर कोटचिरकर श्री किशोर कस्तुरे श्री उमेश पारनेरकर श्री राजेश जोशी वसेकर श्री आर्यन जोशी वसेकर महिला पदाधिकारी सौ. संध्या मुगुटे सौ. कल्पना जोशी वसेकर सौ.

दीपा देशपांडे सौ. सीमा कस्तुरे सौ. उत्कर्षा पारनेरकर सौ. विभा देशपांडे सौ. रूपाली कुलकर्णी सौ. जयश्री कुलकर्णी सौ. शिल्पा दिक्षित सौ. अंजली कोटचिरकरसौ. प्रिया कुलकर्णी कु. समृद्धी चौधरी कु. मानसी दाभाडकर कु. साक्षी दाभाडकरकु. श्रुती पारनेरकरयांची उपस्थिती होती.

*** पुणे** : अजिंक्य योद्धा थोरले बाजीराव पेशवा यांच्या अश्वारूढ पुतळ्याचे अनावरण – केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या शुभहस्ते आज पुणे येथील एनडीए येथे करण्यात आले. याप्रसंगी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणीस उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, अजितदादा पवार, चंद्रकांत दादा पाटील, राज्याच्या खासदार मेधाताई कुलकर्णी, सहकार आणि नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री माननीय मुरलीधर जी मोहोळ, थोरले बाजीराव प्रतिष्ठानचे अध्यक्ष एअर मार्शल (निवृत्त) भूषण गोखले, सचिव कुंदन कुमार साठे, आणि इतर मान्यवर उपस्थित होते. या ऐतिहासिक क्षणी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी थोरले बाजीराव पेशवे यांच्या पराक्रमाची गाथा अतिशय विस्तृतपणे उलघडली. ते म्हणाले रणनीती, नेतृत्व आणि शौर्य यांची त्रिसूत्री साक्षात सिद्ध करणारे, मराठा साम्राज्याचे अद्वितीय, अपराजित सेनानायक यांच्या चाळीस वर्षाच्या सोनेरी कारकिर्दीबद्दल बोलाव तितका कमीच आहे. सतराव्या शतकामध्ये पुण्यातून बाजीरावांनी जो स्वराज्याचा आलेख मांडला आहे, त्या मध्ये तंजावर पासून अटक आणि अटक पासून कटक पर्यंत त्यांनी केलेला पराक्रमाचे वर्णन शाह यांनी आपल्या भाषणात मांडलं. शहा पुढे म्हणाले की बाजीराव पेशवे यांच्या पराक्रमाची तुलना भारतातील इतर कुठल्याही योद्धाशी होऊ शकत नाही . ते वयाच्या २० वर्षांमध्ये ते ४१ युद्ध लढले असून एकाही युद्धात त्यांनी हार पत्करलेली नाही अशा या अजय, अपराजित योद्धाच्या अश्वारूढ पुतळ्याचं अनावरण आज एनडीएत होत आहे, याचा मला अत्यंत अभिमान वाटतो आहे अशा शब्दात शाह यांनी आपलं मत व्यक्त केलं. आणि अशा या पराक्रमी योद्धाचा पुतळा उभारण्यासाठी एनडीए हीच योग्य जागा असल्याचेही त्यांनी नमूद केलं. विशेष म्हणजे अमित शहा यांनी याप्रसंगी वीर सावरकरांच्या कर्तुत्वालाही उजाळा दिलेला आहे. एक व्यक्ती देशासाठी काय काय करू शकतो याचे उत्तम उदाहरण म्हणजे स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर होत, असं म्हणत सावरकरांनी मातृभूमी प्रति केलेल्या त्यागाचा याप्रसंगी शहा यांनी आवर्जून उल्लेख केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भूषण गोखले यांनी केलं. सूत्रसंचालन मोहन शेटे यांनी तर आभार कुंदन कुमार साठे यांनी मानले. या संपूर्ण कार्यक्रमाच्या साठी ज्यांनी अतिव मेहनत घेतली ते म्हणजे थोरले बाजीराव प्रतिष्ठानचे सचिव श्री कुंदन कुमार साठे यांच्या कार्याला सलाम!! अशा हा ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होता आलं याचं अतिव समाधान आहे.

## जोडीदार निवडा

**वधू पाहिजे** ..............................................................................

*** मयूर संजय रामदासी (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** २७/१२/१९८८, **जन्म वेळ :** सायंकाळी ६.५२, **जन्म ठिकाण :** पुणे, **उंची :** ५.६, **रक्तगट :** ए (+), **गोत्र :** कौशिक, **रास :** सिंह, **नक्षत्र :** मघा, **नाडी :** अंत्य, **गण :** राक्षस, **शिक्षण :** बी. कॉम, **नोकरी/व्यवसाय :** Finance (Pune), **वार्षिक उत्पन्न :** ६लाख, **अपेक्षा :** अनुरूप, **संपर्क :** ७७९८९७७९२२

*** अक्षय संतोष देशपांडे (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** १२/०४/१९९२, **जन्म वेळ :** सकाळी

११.१०, **जन्म ठिकाण :** पुणे, **उंची :** ५.७, **रक्तगट :** ए (+), **गोत्र :** काश्यप, **रास :** कर्क, **नक्षत्र :** आश्लेषा, **नाडी :** अंत्य, **गण :** राक्षस, **शिक्षण :** बी. इ. इन मेटलर्जिकल इंजिनिअरिंग, **नोकरी/ व्यवसाय :** तळोजा एमआयडीसी, **वार्षिक उत्पन्न :** ११लाख, **अपेक्षा :** मनमिळाऊ, समजूतदार, **संपर्क :** ९९६७२७२५१०

*** तेजस अरूण कुलकर्णी (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** ११/१०/१९९३, **जन्म वेळ :** दुपारी २.५७, **जन्म ठिकाण :** डोंबिवली, **उंची :** ५.९, **रक्तगट :** बी (+), **गोत्र :** भारव्दाज, **रास :** कर्क, **नक्षत्र :** आश्लेषा, **नाडी :** अंत्य, **गण :** राक्षस, **शिक्षण :** बी. इ. आयटी, **नोकरी/ व्यवसाय :** Rand Merchant Bank Mumbai], **वार्षिक उत्पन्न :** २४लाख ५०हजार, **अपेक्षा :** अनुरूप, मनमिळाऊ, शाकाहारी, **संपर्क :** ९७६४५४६७८९/८२९१०३६०७९/९८१९३९०९८३

*** अमित संजय कुलकर्णी (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** ०६/०२/१९९३, **जन्म वेळ :** दुपारी २.४४, **जन्म ठिकाण :** अहमदनगर, **उंची :** ५.३, **रक्तगट :** ओ (+), **गोत्र :** भारव्दाज, **रास :** कर्क, **नक्षत्र :** पुष्य, **नाडी :** मध्य, **गण :** देव, **शिक्षण :** बी. इ. इनस्ट्रूमेंटेशन, **नोकरी/ व्यवसाय :** डोंबिवली, **वार्षिक उत्पन्न :** ४लाख, **अपेक्षा :** मनमिळाऊ, नोकरी करण्याची तयारी असावी, **संपर्क :** ९६८९६१९३५८/९४०३६४७९३३

*** अनिकेत चेतन दंडगे (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** १४/११/१९९८, **जन्म वेळ :** सकाळी ८.००, **जन्म ठिकाण :** डोंबिवली, **उंची :** ५.११, **रक्तगट :** एबी (+), **गोत्र :** मुनिभार्गव, **रास :** कन्या, **नक्षत्र :** उत्तरभद्रापदा, **नाडी :** आद्य, **गण :** मनुष्य, **शिक्षण :** M.Tech., **नोकरी/ व्यवसाय :** कांजूरमार्ग, **वार्षिक उत्पन्न:** ११ लाख, **अपेक्षा :** मनमिळाऊ, समजूतदार, **संपर्क :** ९८६७३१६६०६

*** प्रथमेश मिलिंद कुलकर्णी (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** ०३/११/१९९९, **जन्म वेळ :** सायंकाळी ६.५५, **जन्म ठिकाण :** उल्हासनगर, **उंची :** ५.११, **रक्तगट :** एबी (+), **गोत्र :** गौतम, **रास :** सिंह, **नक्षत्र:** पूर्वा फाल्गुनी, **नाडी :** मध्य, **गण :** मनुष्य, **शिक्षण :** बी. इ. मेकॅनिकल, **नोकरी/ व्यवसाय :** महापालिकेचे कामाचे ठेके घेणे, **वार्षिक उत्पन्न :** ७ ते ८ लाख, **अपेक्षा :** पदवीधर, मनमिळाऊ, कोणत्याही शाखेची, दिसायाला गोरी, नोकरी नसली तरी चालेल, **संपर्क :** ९८२२९१५८२३

*** आदित्य हेमंत ओक (कोकणस्थ ब्राह्मण), जन्म तारीख :** ३०/०७/१९९५, **जन्म वेळ :** सकाळी ८.२, **जन्म ठिकाण :** डोंबिवली, **उंची :** ५.७, **रक्तगट :** ओ (+), **गोत्र :** वसिष्ठ, **रास :** सिंह, **नक्षत्र :** मघा, **नाडी :** अंत्य, **गण :** राक्षस, **शिक्षण :** बी. कॉम. जर्मन भाषा एक लेव्हल, **नोकरी/ व्यवसाय :** अनशूल इनोव्हेटिव्ह केमिस्ट्री प्रा. लि., धाटाव, रोहा, रायगड येथे स्टोअर्स असिस्टंट, **वार्षिक उत्पन्न :** ३ लाख ४५ हजार, **अपेक्षा:** शक्यतो कोकणस्थ पण पोटशाखा चालेल, पदवीधर, नोकरीची अट नाही, मनमिळाऊ, **संपर्क :** ९१४६५०१४३३/९४२३३८१२२४

*** प्रथमेश मिलिंद टिळक (कोकणस्थ ब्राह्मण), जन्म तारीख :** २९/०४/१९९९, **जन्म वेळ :** पहाटे ४.५०, **जन्म ठिकाण :** कल्याण, **उंची :** ५.७, **रक्तगट :** ए (+), **गोत्र :** शांडिल्य, **रास :** कन्या, **नक्षत्र :** चित्रा, **नाडी :** मध्य, **गण :** राक्षस, **शिक्षण :** एम. कॉम. डिप्लोमा इन फायनान्स, **नोकरी/ व्यवसाय : खाजगी, वार्षिक उत्पन्न :** ७ लाख ४६ हजार, **अपेक्षा :** अनुरूप, सुशिक्षित किमान ग्रॅज्युएट, वयातील अंतर चार वर्षापेक्षा जास्त नको, **संपर्क :** ९८३३७६०२२३/९८१९६७८२९६

*** स्वप्नील संजय चिमोटे (देशस्थ यजुर्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** ०२/०१/१९९०, **जन्म वेळ :** रात्री ८.१५, **जन्म ठिकाण :** नाशिक रोड, **उंची :** ५.८, **रक्तगट :** ओ (+), **गोत्र :** कौशिक, **रास :** कूंभ, **नक्षत्र :** पूर्वा भाद्रपद, **नाडी :** आद्य, **गण :** मनुष्य, **शिक्षण :** Diploma in E&TC. Diploma in Fire & Safety, **नोकरी/ व्यवसाय :** Polycab India Ltd. Nashik, **वार्षिक उत्पन्न :** ३ लाख ५० हजार, **अपेक्षा :** सुशिक्षित, संस्कारी,

सुस्वभावी मनमिळाऊ, **संपर्क :** ९८६०३५०७४२

*** माधव राधेश्याम काटीयार (इतर ब्राह्मण शाखा), जन्म तारीख :** ०५/१२/१९८९, **जन्म वेळ :** पहाटे १२.००, **जन्म ठिकाण :** कल्याण, **उंची :** ५.११, **रक्तगट :** ब (+), **गोत्र :** भारव्दाज, **रास :** कूंभ, **नक्षत्र :** धनिष्ठा, **नाडी : मध्य, गण :** राक्षस, **शिक्षण :** MBA Dip in shipping, **नोकरी/ व्यवसाय :** खाजगी, **वार्षिक उत्पन्न :** १८ लाख, **अपेक्षा :** अनुरूप, **संपर्क :** ९९३०५७०७२०/९०२९७५००१५

## वर पाहिजे ......................................................................................

*** स्नेहल मिलिंद पाठक (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** २७/१०/१९९०, **जन्म वेळ :** सकाळी ७.१७, **जन्म ठिकाण :** नाशिक, **उंची :** ५.५, **रक्तगट :** ओ (+), **गोत्र :** वत्स, **रास :** मकर, **नक्षत्र :** श्रवण, **नाडी:** अंत्य, **गण :** देव, **शिक्षण :** BMS, **नोकरी/ व्यवसाय :** खाजगी, **वार्षिक उत्पन्न :** २१ लाख, **अपेक्षा :** अनुरूप, **संपर्क :** ९७७३७२३३७९/९८१९७५३०४९

*** प्राजक्ता आनंद भेडसगांवकर (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** १८/०१/१९९४, **जन्म वेळ :** पहाटे ३.१०, **जन्म ठिकाण :** दिंडोरी नाशिक, **उंची :** ५.९, **रक्तगट :** बी (+), **गोत्र :** गार्ग्य, **रास :** मीन, **नक्षत्र :** उत्तरा भाद्रपदा, **नाडी :** मध्य, **गण :** मनुष्य, **शिक्षण :** B. Com PGDM¼ Event management, **नोकरी/ व्यवसाय :** खाजगी, **वार्षिक उत्पन्न :** ३ लाख, **अपेक्षा :** अनुरूप,शक्यतो व्यावसायिक, **संपर्क :** ९०२८४७९४६४

**प्रियांका जयंत कुलकर्णी (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** १४/०६/१९९५, **जन्म वेळ :** दुपारी ३.०९, **उंची :** ५.६, **रक्तगट :** ओ (+), **गोत्र :** हरितस, **रास :** धनु, **नक्षत्र :** पूर्वषाढा, **नाडी :** मध्य, **गण :** मनुष्य, **शिक्षण :** B. Pharm, Master in Public Health, P.hd persuing Florida, **नोकरी/ व्यवसाय :** स्टुडन्ट, **वार्षिक उत्पन्न :** २९००० डॉलर, **अपेक्षा :** UDA based work visa / Green Card holder / US Citizen, **संपर्क :** ९९२०८५७८८३/९८१९००७३०४

*** मानसी मनोज कार्यकर्ते (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** २१/०५/१९९५, **जन्म वेळ :** सकाळी ७.५७, **जन्म ठिकाण :** कल्याण, **उंची :** ५.७, **रक्तगट :** ओ (+), **गोत्र :** आर्द्य, **रास :** कूंभ, **नक्षत्र :** धनिष्टा, **नाडी** : मध्य, **गण :** राक्षस, **शिक्षण :** बी. कॉम., **नोकरी/ व्यवसाय :** कल्याण, **वार्षिक उत्पन्न :** ३ लाख, **अपेक्षा :** Masters & Above in any field. Preferably in Mumbai & then Pune, Bangalore & Abroad. (Specify City Also), **संपर्क :** ९३२३६८००३८/९६६५९८००३८

*** अपूर्वा सुजित देशपांडे (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** १९/०८/१९९६, **जन्म वेळ :** सकाळी १०.३०, **जन्म ठिकाण :** नांदेड, **उंची :** ५.३, **रक्तगट :** ओ (+), **गोत्र :** गौतम, **रास :** कन्या, **नक्षत्र :** चित्रा, **नाडी :** मध्य, **गण :** राक्षस, **शिक्षण :** MA Eco., **नोकरी/ व्यवसाय :** LIC DO Thane, **वार्षिक उत्पन्न :** १० लाख ६६ हजार, **अपेक्षा :** वार्षिक उत्पन्न रू. २५ लाखाच्या पुढे, **संपर्क :** ९१३७७८२९९८/९५०३०७२७१७

*** श्रेया विजय वरूडकर (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** ०९/११/१९९७, **जन्म वेळ :** सायंकाळी ५.५६, **जन्म ठिकाण :** दादर (मुंबई), **उंची :** ५.५, **रक्तगट :** ओ (-), **गोत्र :** वशिष्ठ, **रास :** कूंभ, **नक्षत्र:** शततारका, **नाडी :** आद्य, **गण :** राक्षस, **शिक्षण :** B. A./M.A (ENGLISH LITRATURE) B.Ed, **नोकरी/ व्यवसाय :** वर्किंग लेक्चरर, ज्युनियर कॅालेज असिस्टंट प्रोफेसर, सिनीयर कॅालेज कल्याण, **वार्षिक उत्पन्न** : २ लाख ५० हजार, **अपेक्षा :** इंजिनिअर, एम.बी.ए., मर्चंट नेव्ही ऑफिसर, व्यावसायिक, डिफेन्स सर्विस, सुस्थितीतील असावा., उंची - ५.७ ते ६.०, जॉब लोकेशन - मुंबई, नाशिक, पुणे, परदेशी, **संपर्क :**

९८१९६५६१९३/९९३०८३८१६२

*** ऐश्वर्या अरविंद ऐताळ (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** २७/०६/१९९७, **जन्म वेळ :** सकाळी ६.५५, **जन्म ठिकाण :** सांगली, **उंची :** ५.८, **रक्तगट :** ए (+), **गोत्र :** विश्वामित्र, **रास :** मीन, **नक्षत्र :** उत्तरा भाद्रपदा, **नाडी :** मध्य, **गण :** मनुष्य, **शिक्षण :** B.A. (Economics), **नोकरी/ व्यवसाय :** पोलिस सब इनस्पेक्टर, **वार्षिक उत्पन्न :** ७ लाख, **अपेक्षा :** वेल सेटल, मुंबईमध्ये नोकरी करणारा, उंच, निर्व्यसनी, शक्यतो पश्चिम महाराष्ट- मधील, **संपर्क :** ९५५२२७३०४८

*** श्वेता धोत्रेकर (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** ०७/०९/१९९७, **जन्म वेळ :** सकाळी १०.३३, **जन्म ठिकाण :** बेंगळुरू, **उंची :** ५.५, **गोत्र :** जमदग्नि, **रास :** तुला, **नक्षत्र :** स्वाती, **नाडी :** अंत्य, **गण :** देव, **शिक्षण:** एम.एससी. केमिस्ट्री फ्रॉम एन आय टी नागपूर, **नोकरी/ व्यवसाय :** सर्विस, **वार्षिक उत्पन्न :** ६ लाख, **अपेक्षा:** मराठी भाषिक, देशस्थ कुटुंब परदेशी नाही, वयाचा फरक ३ वर्षांचा असावा, (Specify City Also) हैदराबाद, मुंबई, पुणे, बंगळुरू, **संपर्क :** ९८७३६७८६५४

*** नुपुरा अतुल देशपांडे (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** १६/०९/१९९९, **जन्म वेळ :** सकाळी ७.५५, **जन्म ठिकाण :** चिपळूण, **उंची :** ५.३, **रक्तगट :** एबी (-), **गोत्र :** जमदग्नी, **रास :** वृश्चिक, **नक्षत्र :** अनुराधा, **नाडी :** मध्य, **गण :** देव, **शिक्षण :** बी. इ. इनक म्प्युटर इंजीनियरिंग, एम एस इन मार्केटिंग Salford युनिव्हर्सिटी, Manchester, U.K., **नोकरी/ व्यवसाय :** लंडन, **वार्षिक उत्पन्न :** २२ लाख, **अपेक्षा :** मुली इंडियामध्ये परत यायचे असल्याने थोड्या कालावधीसाठी परदेशात असलेला मुलगा चालेल, भारतात वेल सेटल असलेला मुलगा असला तर उत्तम. कुठल्याही क्षेत्रातला उच्चशिक्षित मुलगा चालेल, **संपर्क :** ८८०५३७२५२६

*** प्रतिका भालचंद्र घाटे (कऱ्हाडे ब्राह्मण), जन्म तारीख :** ११/०७/१९९७, **जन्म वेळ :** पहाटे ५.३०, **जन्म ठिकाण : मुंबई, उंची :** ५.५, **रक्तगट :** ओ (+), **गोत्र :** कौशिक, **रास :** कन्या, **नक्षत्र :** उत्तरा, **नाडी :** आद्य, **गण :** मनुष्य, **शिक्षण :** एम. कॉम, एम. बी. ए., **नोकरी/ व्यवसाय :** खाजगी, **वार्षिक उत्पन्न :** ५ लाख, **अपेक्षा :** पदवीधर, सुशिक्षित, समंजस, शक्यतो मुंबईचाच (ब्राह्मण शाखा), **संपर्क :** ९१६७२९५५३४/ ९८१९४८५५३४

## कृतज्ञता देणगी

वय वर्षे अवघे ९२. साधी राहणी. आरोग्य सेवेत संपूर्ण आयुष्य समर्पित केलेल्या (परिचारिका ते मेट्रन) सामाजिक मूल्य जपणे आणि समाजाच आपण देणं लागतो या विचाराच्या, मुंबई येथे राहणाऱ्या श्रीमती विमल नारायण शहापूरकर यांनी एक लाख रुपयाचा देणगीचा धनादेश त्यांचे बंधू श्री अरविंद गणेश आचार्य यांच्या नावे आज अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाचे कार्याध्यक्ष श्री प्रभाकर कुलकर्णी, कार्यवाह व संपादक श्री मिलिंद सरदेशमुख, कार्यकारिणी सदस्या सौ ज्योती माधव जोशी यांचेकडे सुपूर्द केला. मध्यवर्ती मंडळ करीत असलेल्या सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक कार्य अत्यन्त मोलाचे आह. माझ्या बंधूना देखील शैक्षणिक मदत झाल्याचे त्यानी सांगितले. मंडळाचेवतीने कार्याध्यक्ष प्रभाकर कुलकर्णी यांनी शाल श्रीफळ देऊन श्रीमती विमल शहापूरकर यांना सन्मानित केले.

# अभिप्राय

नमस्कार.

समाचारच्या जूनच्या अंकात 'सामुहिक आरोग्य विमा' योजने बाबत माहिती वाचली आणि बडोदा संम्मेलनाआधी आपल्या बेळगांव मुक्कामी झालेल्या भेटीची आठवण झाली. ज्येष्ठ नागरिक, असंघटित क्षेत्रात कार्यरत कर्मचारी आणि सेल्फ एम्प्लॉइड व्यक्तींसाठी एक अतिशय आवश्यक असं हे पाऊल आहे ज्या विषयी समाजमनाला फारशी माहिती अजिबातच नाही हे खेदाने नमूद करावेसे वाटते. या एका आवाहना द्वारे संलग्न संस्था आणि त्यांचे स्थानिक सदस्य यांच्यात संवाद आणि माहिती आदानप्रदान होऊन ती आपल्यापर्यंत १५ जुलै पर्यंत पोहोचेल या बाबत आशावादी असणं ठीक आहे पण असा तत्परतेने प्रतिसाद संलग्न संस्था आणि त्यांचे सदस्य देणं हे देशस्थी परंपरे विरूद्ध होईल. तूर्तास ज्या मध्यवर्ती सदस्यांची या योजनेत सहभागाबाबत माहिती उपलब्ध आहे (पाच हजार ही संख्या ॠत्वउ साठी कमी नाही) ती घेऊन सुरुवातीची पावले उचलली जावीत आणि त्याबाबतची प्रगती समाचार च्या दर अंकामध्ये प्रसिद्ध केल्यास जनजागृती होईल, संलग्न संस्था देखील याबाबत जागृती घडवतील असे वाटते. खरं तर ही 'सामुहिक आरोग्य विमा योजना' आपल्या सदस्यांना एकत्र बांधून ठेवण्याचा दुवा ठरू शकते आणि दर वर्षीच्या नुतनीकरणामुळे सदस्य नोंदणी मध्ये agileness, alertness येईल जे संस्थेच्या (मध्यवर्ती आणि संलग्न) दृष्टीने अनेक मार्गांनी हिताचं ठरेल असं वाटतं.

**श्री. विनय कुलकर्णी**
बेळगाव



श्रीमती विमल शहापूरकर, गोरेगाव, मुंबई यांचा मध्यवर्ती मंडळातर्फे गौरव



श्री. रामचंद्र दिगवडेकर, मुलुंड यांचा सत्कार


IndusInd Bank
THE ULTIMATE SAVINGS ACCOUNT IS HERE
%
Attractive Interest Rates*
on savings account and fixed deposits
My ACCOUNT My NUMBER
Freedom to choose your account number
GET UP TO 20%* OFF
on food & groceries from Swiggy & BigBasket
BUY ONE GET ONE FREE
movie ticket on BookMyShow*
Complimentary Airport Lounge Access*
Attractive discount on all locker types
Indus Mobile
All-in-one app for banking, shopping, travel, payments and much more
AutoPay
Manage your payments & SIPs using UPI, cards & mobile
*T&C Apply
To know more, please speak to our Customer Service Manager or visit us at www.indusind.com

*With best compliments from*

# SAMARTH

## URBAN CO-OP. CR. SOCIETY LTD.

**HEAD OFFICE:** Samarth Sadan, Gurukrupa Complex, 1st Floor, Maruti Galli, Belgaum. **Ph.: 2431357, 2403968, 4202100**

**RC Nagar Branch:** Bhagirathi, C Scheme, Channama Nagar Main Road, Belgaum. **Ph.: 2443161**

**Tilakwadi Branch:** Samarth Landmark, Opp. Indian Bank, Mangalwar Peth, Tilakwadi, Belgaum. **Ph.: 2430357**

**Shahapur Branch:** 1103, Ground Floor, Bichu Galli, Shahapur, Belgaum. **Ph.: 2431257**

**Khanapur Branch:** 1524/A6, Manerikar Bldg., Belgaum-Goa Road, **Ph.: 6363090655**

### AKSHAY DEPOSIT SCHEME

| | | | |
|---|---|---|---|
| 46 days to 180 days | 6.00% PA | 2 years | 9.00% PA |
| 181 days to 364 days | 6.50% PA | 3 years | 10.00% PA |
| 1 year | 8.00% PA | | |

Senior Citizen 1% extra*

### NIRANTAR

| | |
|---|---|
| 1 year | 8% PA |
| 2 years | 9% PA |
| 3 years | 10% PA |

*T&C Apply



**Adv. Ajay A. Sunalkar**
Chairman



**Rtn. Abhay V. Joshi**
Vice - Chairman

### BOARD OF DIRECTORS

Ganapat A. Kulkarni • Vinayak G. Joshi • Pradeepkumar G. Kulkarni
Arvind S. Kulkarni • Maltesh G. Patil • Sunanda C. Altekar • Chaya N. Joshi
Anil V. Bhandari • Umesh D. Sungar • Parashuram M. Kamble • Ashok H. Pujeri
Raghavendra S. Kesnur - Secretary • Gouri S. Bidi - Gen. Manager

**A LEADING CO-OPERATIVE SOCIETY IN BELGAUM DISTRICT**

anandads

**Samachar Patrika RNI 16775/1967 Regd. No. MCW-126/2024-26,** Published on 15th of every month. Posted at MUMBAI PATRIKA CHANNEL SORTING OFFICE, GPO, Mumbai - 400 001 on, 15th Day of every month.



Printed and Published by MILIND MALHARRAO SARDESHMUKH on behalf of AKHIL DESHASTHA RUGVEDI BRAHMAN MADHYAWARTI MANDAL,Printed at GURUKRUPA, 03, ROSSARY BUILDING, M M C ROAD, MAHIM (WEST), MUMBAI 400 016 and Published from AKHIL DESHASTHA RUGVEDI BRAHMAN MADHYAWARTI MANDAL, LAXMI NARAYAN BAUG, BAL GOVINDAS MARG, MAHIM, MUMBAI 400 016. Editor : MILIND MALHARRAO SARDESHMUKH